## प्रकरण - दुसरे

# ‘वाटा-पळवाटा’ नाटक
# व
# ‘भाकरी आणि फूल’ या कादंबरीतील
# समान आशयसूत्र : साम्य आणि भेद

# प्रकरण - दुसरे

# 'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील समान आशयसूत्र : साम्य आणि भेद

## ❖ प्रास्ताविक :

भिन्न वाङ्मय प्रकारातून (कादंबरी आणि नाटक) भिन्न काळातील निर्मिती व्यवहार जर एकच आशयसूत्रावरती असेल तर हा वाङ्मयीन व्यवहार कोणत्या स्वरूपाचा असतो हा वाङ्मयीन व्यवहार समाज आशयसूत्रावरती असूनही वाङ्मयीन प्रकारानुसार या समान आशयसूत्रातही काही प्रमाणात भेद असतात. अशी साम्य-भेदाची समान स्थळे 'वाटा-पळवाटा' (नाटक) व 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) यातील आशयसूत्रात दाखविणे व त्यांच्या कारणांचा शोध घेणे हे प्रस्तुत प्रकरणाचं प्रयोजन आहे.

वाङ्मय प्रकारातील आशयसूत्रातील साम्य-भेदांची चर्चा करताना प्रथम आशयसूत्र ही संकल्पना स्पष्ट होणे गरजेचे आहे. या विषयीचे विवेचन पहिल्या प्रकरणामध्ये केले आहे. आशयसूत्रात फरक (भेद) पडण्यामागे वाङ्मय प्रकारांचे विशिष्ट 'रूप' (फॉर्म) कार्य करत असते. आशयसूत्रात साम्य-भेद पाहत असताना 'वाटा-पळवाटा' (नाटक) व 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) यामधील आशयसूत्राची चर्चा करताना समीक्षा संज्ञाकोशातील आशयसूत्रासंबंधीचा विचार या दृष्टीने पाहणे गरजेचा आहे. "आशयसूत्र (थीम) म्हणजे साहित्यकृतीच्या अनुभवविश्वाचे वा आशयक्षेत्राचे केंद्रवर्ती किंवा मध्यवर्ती सूत्र होय. पुष्कळदा या आशयसूत्राला 'साहित्यकृतीची मध्यवर्ती कल्पना' असे ही म्हटले जाते; साहित्य कृतीत एक किंवा एकाहून अधिक प्रधान गौण आशयसूत्रे वसत असतात."[१] ह्या कोशगत विचार 'वाटा-पळवाटा' (नाटक) व 'भाकरी आणि फूल' (कादंबरी)लावून पाहिल्यास या दोन्ही कलाकृतीतील आशयसूत्राच्या साम्य-भेदांची चर्चा अधिक काटेकोरपणाणे करता येईल.

'वाटा-पळवाटा' (नाटक) व 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) या कलाकृतींची मध्यवर्ती कल्पना अथवा आशयक्षेत्राचे केंद्रवर्ती सूत्र व त्याबरोबर येणारी प्रधान-गौण आशयसूत्रे पाहिल्यानंतर त्यातील साम्य-भेदांची चर्चा करता येईल.

### ❖ 'वाटा-पळवाटा' या नाटकाचे आशयसूत्र :

दलित रंगभूमीवरील नाटकातून प्रकट झालेला विद्रोह, वेदना आणि नकार ह्या जाणिवा समाजात मूल्यात्मक जीवन जाणिवांची निर्मिती करण्यासाठी प्रकट झालेल्या आहेत. परंपरा, रूढी, दुष्टप्रथा यांचा त्याग करून माणुसकी निर्माण करण्याचे ध्येय आंबेडकरी चळवळीचे आहे. हेच ध्येय दलित रंगभूमीचे आहे. या दलित रंगभूमीचा अभ्यास करताना दत्ता भगत यांच्या नाटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कारण दत्ता भगत यांनी समकालीन विशेषत: दलित रंगभूमीला (दलित नाटकाला) दलित प्रेक्षकांपुरते मर्यादित न ठेवता सर्व रसिकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन दत्ता भगतांनी नाट्यलेखन केले आहे. एवढेच नव्हे तर रंगभूमीला नवसामर्थ्य मिळवून देण्याचाही प्रयत्न केला आहे. दत्ता भगत यांचा 'कार्यकर्ता' म्हणून आलेला अनुभव तसेच भगत यांचा असणारा नाट्यलेखन तंत्राचा अभ्यास सूक्ष्म निरीक्षण या पार्श्वभूमीवर 'वाटा-पळवाटा' या नाटकाच्या आशयसूत्राचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

'वाटा-पळवाटा' हे दत्ता भगतांचे बहुचर्चित नाटक २७ डिसेंबर १९८८ रोजी प्रथमत: रंगमंचावर आले. या नाटकात भगतांनी दलितांच्या तीन पिढ्यांमधील वैचारिक संघर्ष मांडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेल्या या तीन पिढ्या व त्यांच्याशी संबंधित असलेले राजकारण दलित राजकारण आणि समाजकारण या विषयीची चळवळीची परखड समीक्षा दत्ता भगतांनी केली आहे. यामुळे हे नाटक दलित तसेच दलितेतरांना सुद्धा अंतर्मूख करते.

दत्ता भगत यांचे नाट्यलेखन सामाजिक भान देणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या परिवर्तनशील विचारांचा परिपाक आहे. समाज बदलाची अंतर्गत प्रेरणा त्याच्या केंद्रवर्ती आहे. त्यामुळे त्यांच्या नाटकाचा विचार करताना त्यांनी केंद्रवर्ती ठेवलेला सामाजिक परिप्रेक्ष जाती विहीन समाजाची स्वप्ने पाहणारा आहे. म्हणूनच दत्ता भगत आपल्या नाट्य कथानकाची, घटना प्रसंगाची निवड करताना हा हेतू सतत बाळगलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या नाटकातील कथानकाचे संघटन आशयसूत्राद्वारे परिपूर्ण होत असते. "कथानक हा

कथात्म तसेच नाट्यात्म साहित्याचा एक महत्त्वाचा मूलघटक होय. कथानकाचा मूलघटक 'घटना' होय. घटनांच्या विशिष्ट प्रकारच्या संघटनेतून कथानक आकाराला येत असते या घटना बाह्य विश्वातील, तसेच आंतर्विश्वातील म्हणजे भौतिक, सामाजिक तसेच मानसिक स्वरूपाच्याही असू शकतात. अशा घटनांची कथानकात जी गुंफण केलेली असते. तिच्या मागे एक संघटन तत्त्व असते. त्यातूनच कथानकाला एक विशिष्ट रूप लक्षात असते. प्रत्येक साहित्यकृतीत एक अमूर्त आशयसूत्र असते. हे आशयसूत्र कथानकातून समूर्त होत असते. एका अर्थी आशयसूत्रच कथानकाची संघटना करीत असते."[२] दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटकाचे आशयसूत्र पाहायचे झाल्यास या नाटकाच्या कथानकावर दृष्टिक्षेप टाकणे गरजेचे ठरते. संहिता पाहणे संयुक्तिक ठरते कारण आशयसूत्र हे लेखकाला अमूर्त स्वरूपात जाणवलेले असते. साहित्यनिर्मितीत शब्दार्थमय रूपातून समूर्त होत असते. या दृष्टीने 'वाटा-पळवाटा' या नाटकाची संहिता पाहिल्यास आपल्याला पुढील स्वरूपात एक केंद्रवर्ती सूत्र आढळून येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने (व्यक्तिमत्त्वाने) भारावलेल्या तीन पिढ्यांचे चित्रण 'वाटा-पळवाटा' नाटकात केले असल्याचे दत्ता भगत यांनी प्रास्ताविकात म्हटले आहे. या तीन पिढ्यांतील गुंतागुंतीचे अंतर व द्वंद्व (संघर्ष) विविध प्रसंग व घटना यांच्या माध्यमातून केले आहे. आशयसूत्रास कथात्म तसेच नाट्यत्म रूप देताना दत्ता भगत घटनांची विशिष्ट प्रकारची संघटना बांधताना दिसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्या दत्ता भगतांच्या समोर आहेत. या तीन पिढ्यांमध्ये असणारे अंतर फार गुंतागुंतीचे आहे. पहिली पिढी इंग्रजांच्या राजवटीतील अशिक्षित असल्याने एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी, तेवढा बौद्धिक आवाकाही नसणारी पण प्रामाणिक कार्यकर्त्यांची, दुसरी पिढी सुशिक्षित थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली स्वातंत्र्याच्या आगमनामुळे लोकशाही जीवन पद्धतीचे आश्वासन मिळालेले या पिढीच्या सभोवतीचे वास्तव ध्येयवादी वातावरणाच्या धक्यामुळे काहीसे उबदार व धूसर झालेले या पार्श्वभूमीवर आपल्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करणारी तर तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातील परिवर्तनाची गती आणि अपेक्षा यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेली, धाडसी पण लोकशाही वरचा विश्वास गमावून

बसलेली या तीन पिढ्यांत घडून येणारा संघर्ष वैचारिक द्वंद्व (जनरेशन गॅप) हे 'वाटा-पळवाटा' नाटकाचे केंद्रवर्ती सूत्र आहे.

पूरग्रस्त दलितांना घरे मिळवून देण्यासाठी या तीन पिढ्या एकत्र आल्या आहेत आणि या निमित्ताने घडून आलेला तीन पिढ्यांचा संघर्ष या नाटकात दत्ता भगत मोठ्या कलात्मकतेने रेखाटताना दिसतात. प्रत्येक माणूस हा जीवन जगत असताना कुठे तरी तडजोड करतो आणि कुठे अडथळे आलेच तर सहिसलामत सुटण्यासाठी 'वाटा-पळवाटा' शोधतो हे मानवी मनाचे अंतिम रहस्यही या नाटकात उलगडले आहे.

'वाटा-पळवाटा' या नाटकाचे कथानक पाहिल्यास आपल्याला अमूर्त पातळीवर असणारे आशयसूत्र मूर्त स्वरूप धारण करताना दिसते. 'वाटा-पळवाटा' नाटकाचे कथानक पाहिल्यास हे अमूर्त पातळीवरील आशयसूत्र आपल्या लक्षात येते. दत्ता भगतांनी 'सखेद सादर करीत आहे' असे नाटकाचे प्रारंभीचे नामकरण होते, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी या नाटकाच्या मनोगतामध्ये दिलेली आहे. 'सखेद' या शब्दात अंतरीची वेदना व्यक्त करण्यासाठी मोकळी करून दिलेली वाट ही अर्थछटा केंद्रवर्ती आहे. त्यामुळे अंतरमनातील संघर्ष व्यक्त करण्यासाठी दत्ता भगत यांनी ही नाट्यनिर्मिती करण्याचा संकल्प केला. मात्र चळवळीचे बाह्यरूप अनुभवताना विचार आणि आचारामध्ये जाणवत असलेली तफावत त्यांच्या अनुभवास येते. आत एक आणि बाहेर दुसरे हा आशय अधिक परिणामकारक करण्याच्या हेतूने त्यांनी 'वाटा-पळवाटा' या समर्पक शीर्षकाची योजना केलेली दिसते. 'वाटा-पळवाटा' तील हा बाह्यतकारी अनुभव शीर्षकातून जाणवत असला तरी तीन पिढ्यांतील संघर्ष अत्यंत परिणामकारकरीतीने व्यक्त केला आहे. मानवी मनामध्ये चालू असलेला अमूर्त पातळीवरील संघर्ष मांडण्यासाठीच दत्ता भगत तीन पिढ्या आणि त्या तीन पिढ्याची मानसिकता सहजगत्या उलघडून दाखवतात. अमूर्त मनात सृष्ट-दृष्ट, चांगले-वाईट, नैतिक-अनैतिक, सत्य-असत्य या भावनांचा सतत संघर्ष सूरु असतो. तो दृश्य रूपात अनुभवता येत नाही. मात्र प्रत्येक व्यक्तिमत्त्वात या भावनांचे काही अंश जोपासले जात असतात. हे दत्ता भगत यांनी अत्यंत सूक्ष्म रीतिने मांडले आहे.

'वाटा-पळवाटा' या नाटकात जुन्या पिढीतील कडवे निष्ठावान कार्यकर्ते आणि नव्या पिढीतील साधनसुचितेचा विचार न करता साध्याकडे मुसंडी मारणारे नेतृत्त्व यांच्या

कात्रित सापडलेला सुशिक्षित, विचारी दलित प्रतिनिधी आणि त्यांचे हाताशपण आणि शेवटी नव्या नेतृत्त्वाखाली चांगुलपणाचा अंकुर जोपासण्यासाठी त्याला नाईलाजाने कृतिशील व्हावं लागण या परिस्थितीला उद्देशूनच भगतांनी प्रस्तुत नाटकातील व्यक्तिरेखांवर दृष्टिक्षेप टाकला आहे. काका प्रत्यक्ष आंबेडकरी चळवळीत लढले आहेत, तरी ते शेवंता या दलित महिलेला शिकविण्याचा अनुभव नसतानाही अनुभवाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. प्रा. सतीश केवळ विचार करतो मात्र चळवळीच्या बाबतीत निष्क्रिय बनतो. प्रा. सतीश हा दलितसमाजातील बुद्धिजीवी म्हणून समजली जाणारी व्यक्तिरेखा. मात्र त्यांनी आपल्या बुद्धीचा उपयोग आंबेडकरी चळवळ, आंबेडकरी जनतेच्या विकासासाठी कधीही उपयोगात आणलेला नाही. अर्जुन मात्र पूरग्रस्तांना घरे मिळावी म्हणून चळवळ करणारा हा विद्रोही सुद्धा त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा भ्रष्टाचार करतो. हेमा ही प्रा. सतीश या दलित प्राध्यापकाबरोबर विवाह करणारी उच्चवर्णीय नायिका असून ती आपल्या उच्चवर्णिय परंपरेपासून मुक्त होऊ शकत नाही. मानवी जीवन आदर्शमय असते. कोणतातरी आदर्श हा जीवनाचा अविभाज्य घटक ठरतो. परंतु त्या आदर्शवत जीवनाप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणे अवघड असते. अशा या अंतरविरोधातूनच सामाजिक हानी होते. दत्ता भगत यांनी रेखाटलेल्या वरील व्यक्तिरेखा आपल्या आदर्शापासून पाठ फिरवत असल्यामुळे आंबेडकरी चळवळीची होत असलेली हानी या नाटकात साकार केली आहे. सहेतूक आणि सहजता या व्यक्तिरेखांच्या उभारणीतील विशेष याठिकाणी जाणवतात.

या नाटकामधून दलितांनी आत्मपरिक्षण करावे असे भगतांना सूचित करायचे आहे. या नाटाकतील काका, सतीश, अर्जुन, हेमाला आंबेडकरी विचारांचे आकलन झाले नाही. त्यामुळेच दत्ता भगतांना हे सखेद सादर करावे वाटले आहे. या सर्वांच्या पाठीमागे जी कारणे आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे दलित समाजाला आंबेडकरी विचारांचे, बौद्ध धम्माचे आकलन झालेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर बौद्ध धम्माचा प्रचार आणि जागृती व्हायला हवी होती, ती झाली नाही त्यामुळे खरा आंबेडकरी विचार लोकांच्यापर्यंत पोहचलाच नाही किंवा आंबेडकरी विचारांचे आकलन सर्वसामान्यांना झाले नाही, हे दत्ता भगतांनी कथानकाच्या मूर्त स्वरूपातून दाखवून दिले

आहे. आंबेडकरी विचार शेवटपर्यंत झिरपला नसल्याचे नाटकाचा आशय आणि पात्रांच्या स्वभावचित्रणावरून दिसते.

'वाटा-पळवाटा' या नाटकाच्या आशयला वेगवेगळे पैलू आहेत. साहित्यकृतीला एक मध्यवर्ती आशयसूत्र असते. त्याबरोबरच प्रधान-गौण अशी आशयसूत्रे असू शकतात. त्याप्रमाणेच 'वाटा-पळवाटा' या नाटकाचे कथानक पाहिल्यास आपल्याला हे आढळून येते. पूरग्रस्त दलितांना घरे मिळवून देण्यासाठी या तीन पिढ्या एकत्र आल्या आहेत. आणि या निमित्ताने घडून आलेला या तीन पिढ्यांचा संघर्ष या नाटकात कलात्मकतेने रंगविला आहे. तसेच ब्राह्मण मुलगी व दलित (बौद्ध) मुलगा यांच्या वैवाहिक जीवनाचे समजूतदार प्रेमाचे आणि त्यांच्या सुखी संसाराचे चित्र रेखाटले आहे, आंतरजातीय विवाहातून होणारे सामाजिक अभिसरण, दलित प्रश्नांकडे पोटतिडकिने पाहणारा पँथरिस्ट, आंबेडकरी विचारांचे प्रेक्षपण, दलितांच्या निवासाचा प्रश्न आणि ब्राह्मणांची अस्पृश्याकडे बघण्याची मानसिकता या सर्व याच्यातून दलितांचे आत्मभान आणि जागृती यातून घडणारी दलितांची सामाजिक जाणीव आणि मानसिकता याचा वेध हे नाटक घेते. माणूसकी आणि जीवन यापुरते हे नाटक नसून त्यामधून जातीयतेमुळे कोलमडणाऱ्या व्यवस्थेचे चित्रण देखील येथे आले आहे. अर्जुन स्वत:चा संसार उभा करत नाही. शेवंता राजकीय संघर्षाचा बळी जाते, तर सतीश या परिस्थितीपुढे शरण आलेला आहे. केवळ जातीयतेमुळे अर्जुनला कॉलेजमधून काढले जाते, माणुसकी संपत आली आहे माणूस दूर चालला आहे. यातून त्याचे आयुष्य कसे कोलमडते याची साक्ष येते. यामुळे डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार होत नाही आणि दलित चळवळ जातीयतेच्या फेऱ्यात अडकते. अशी ही वेदना काकांना सहन होत नाही आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत होतो. अशी प्रधान-गौण आशयसूत्रे मध्यवर्ती आशयसूत्राला पूरक अशीच आहेत. त्यामुळे 'वाटा-पळवाटा' चा रूपबंध हा एकजिनसीच राहतो.

एकंदरीत, या नाटकातील वाटा सर्वांना पळवाटा वाटत असल्या तरी त्या तशा नाहीत. येथे प्रत्येकाचा स्वत:शी, समाजव्यवस्थेशी, जातीयतेशी आणि मानवी मूल्याशी संघर्ष चालू आहे. आणि यातच त्याच्यावर तडजोडीची वेळ आलेली आहे. हे 'वाटा-पळवाटा' नाटकाचे एकूणच आशयसूत्र पाहित्यानंतर आपल्या लक्षात येते.

## ❖ 'भाकरी आणि फूल' कादंबरीचे आशयसूत्र :

१९६० नंतरच्या मराठी सहित्यात एक महत्त्वाचे स्थित्यंतर निदर्शनास येते, ते म्हणजे दलित साहित्याची निर्मिती ही होय. प्रस्थापित मराठी साहित्यातून दलितांच्या जीवनाचे चित्रण विशेषत्त्वाने होत नव्हते. डॉ. आंबेडकर यांच्या विचार आणि चळवळीमुळे जागृत झालेल्या दलित समाजाला आत्मभान आल्यामुळे त्यांनी आपल्या व्यथा व वेदना मांडण्यास आरंभ केला गेला. त्यामुळे मराठी साहित्यात दलित वाङ्मयाची भर पडली. दलित जीवनाच्या चित्रणाला वाङ्मयात स्वत: दलित असणाऱ्या लेखकांनी वाट करून दिली. त्यामुळे दलितांच्या दुरावस्थेचे चित्रण अधिक वास्तवपूर्ण होऊ लागले.

शोषण करणाऱ्या धर्मव्यवस्थेला व सामाजिक व्यवस्थेला नकार देणे हा जसा दलित साहित्याचा पहिला आणि स्वाभाविक उच्चार असतो. तसाच तो राजकीय व्यवस्थेलाही नाकारत असतो. अशा प्रकारे दलित व्यक्तिंना-व्यक्तिसमूहांना तीन पातळ्यांवर एकाचवेळी लढावे लागते. दलित साहित्य या लढ्याचा एक भाग म्हणून येते. एकंदरीत पारंपरिक मानसिकते विरूद्ध वैचारिक संघर्ष करणे हे दलित साहित्यापुढे आव्हान आहे. विविध स्थित्यंतरातून दलित समाज जात असताना साहित्यात त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविकच असते. आशयाचा व्यापक पट मांडणाऱ्या कादंबरीमध्ये तर तो येणे क्रमप्राप्त ठरते. याला दलित कादंबरी अपवाद ठरत नाही.

गावकुसाबाहेरील दलित समाजाचे चित्रण करणाऱ्या ह्या साठोत्तरी कादंबऱ्यामधून गावकुसाबाहेरील दलितांची वस्ती आणि घरे-दारे त्यांचे दारिद्रय, व्यवसाय त्या समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे चित्रण येते. सवर्ण समाजाकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराबरोबरच त्यांच्याकडून मिळणाऱ्या चांगल्या वागणुकीचेही चित्रण येते. दलित समाजातील वेगवेगळया जातीतील परस्पर संबंध काही लेखक उलगडून दाखवतात. स्वातंत्र्योत्तर दलित समाजात झालेला बदल चित्रित होतो. त्यामधून आंबेडकरी विचाराने आत्मभान आलेला, दलित समाजाची झालेली जागृती तसेच त्यांच्या संघटना आणि चळवळींचेही चित्रण येते. नव्या पिढीतील सुशिक्षितांची मानसिकताही अचूकपणे टिपलेली दिसते.

स्वातंत्र्यानंतर जीवन जसे आहे तसे चित्रित करण्याची वृत्ती लेखकांच्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. त्यांनी जुने वाङ्मयीन संकेत झुगारून देऊन मानवतावादी दृष्टिकोनातून मानवी जीवनाकडे व समाजाकडे पाहिल्याने साहित्यातून माणसांच्या जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. याच काळात मराठी साहित्यात दलित साहित्याची भर पडली त्यामुळे शहर व ग्रामीण भागातून राहणाऱ्या दलित माणसाकडे लेखकवर्गाचे लक्ष वळले आणि त्यांनी या वर्गाचे आस्थेने चित्रण आपल्या साहित्यातून ते करू लागले. दलित साहित्यात दलित जाणिवेला महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे ज्या कलाकृतीमधून दलित जाणीव व्यक्त होते ति कलाकृती दलित साहित्याच्या प्रवाहामध्ये सहभागी केली जाते. दलित साहित्यामध्ये समीक्षकांचा एक गट दलित साहित्याची व्याख्या करताना, "दलितांनी दलितांसाठी दलितांकडून केलेली निर्मिती त्याला दलितसाहित्य म्हणावे." अशी ढोबळ व्याख्या घेऊन दलित साहित्य हे दलितांकडूनच केले गेले पाहिजे. त्यालाच दलित साहित्य संबोधन्याची प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीमुळे दलितेतरांनी दलित जाणीव केंद्रवर्ती ठेवून एखादी साहित्यकृती निर्माण केली तर त्या साहित्यकृतीला दलित साहित्यात अंतर्भूत करणे अशक्य होते. मात्र अशा प्रकारची भूमिका अस्मितादर्शकार यांनी फेटाळली व दलित जाणिवेचे दलित जणिवेने केलेली कोणतीही साहित्यकृती दलित संबोधावी अशी भूमिका मांडली. एवढेच नाही तर दलितेतरांपैकी फ. मु. शिंदे, बापुराव जगताप इ. ना दलित साहित्याच्या प्रवाहात सामावून घेतले. मधु मंगेश कर्णिक हे सुद्धा दलितेतर समुहापैकी आहेत. त्यांची 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी दलित जाणिवेचे वास्तवपूर्ण चित्रण मांडणारी आहे. त्यामुळे या साहित्यकृतीला दलित कादंबरीच्या परिप्रेक्षामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. काहीवेळा दलितेतर लेखक दलितांचे जीवन चित्रित करताना त्यांचा सूर सहानुभूतीचा असतो. मात्र कर्णिक दलित जाणीव अभिव्यक्त करताना सहानुभूतिऐवजी प्रांजळपणे आणि प्रामाणिकपणे वास्तवपूर्ण दलित जीवन अभिव्यक्त करतात. तात्पर्य 'भाकरी आणि फुल' ही कादंबरी दलित कादंबरीच्या इतिहासात स्थान मिळवलेली कादंबरी आहे.

मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीच्या आशयसूत्राचा विचार येथे करावयाचा आहे. 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी 'दलित कादंबरी' या प्रकारात मोडते. या कादंबरीचा आशयच ही वस्तुस्थिती अधोरेखित करतो. कारण दलित

कादंबरीतील आशयाच्या वेगळेपणाचा लक्षणीय पैलू सांगताना विलास कांबळे असे म्हणतात की, ''दलित कादंबरीला आंबेडकरांचे वैचारिक आधिष्ठन प्राप्त झालेले आहे.''[3] 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत अगदी प्रथमपासून आंबेडकरांच्या विचारांशी व चळवळींशी बांधिल राहून त्या चळवळीच्या यशापयशाची चर्चा करत तीन पिढ्यांचा आंबेडकरी विचार आणि प्रत्यक्ष जीवन आणि प्रत्यक्ष जीवन जगतानाचे ताण-तणाव हा मानसिक व शारीरिक संघर्ष हाच या कादंबरीचा मुख्य आशय आहे.

कथानक हा कथात्म, नाट्यात्म, साहित्याचा एक महत्त्वाचा घटक असतो. हे आपण 'वाटा-पळवाटा' नाटकाचे आशयसूत्र पाहत असताना पाहिले. कथानकाचा मूलघटक 'घटना' हा होय. घटनांच्या विशिष्ट प्रकारच्या संघटनेतून कथानक आकाराला येत असते. या घटनाबाह्य विश्वातील, तसेच अंतविश्वातील म्हणजे भौतिक, सामाजिक तसेच मानसिक स्वरूपाच्याही असू शकतात. अशा घटनांची कथानकात जी गुंफण केलली असते. तिच्या मागे एक संघटन तत्त्व असते. त्यातूनच कथानकाला एक विशिष्ट रूप लाभत असते. प्रत्येक साहित्यकृतीत एक अर्मूत आशयसूत्र असते. हे आाशयसूत्र कथानकातून समूर्त होत असते. एका अर्थी आशयसूत्रच कथानकाची संघटना करत असते. या संदर्भाने 'भाकरी आणि फूल' कादंबरीच्या कथानकाची संघटना पाहिल्यास कादंबरीच्या एकूणच आाशयसूत्रावरती दृष्टीक्षेप टाकता येतो.

१९८२ साली प्रसिद्ध झालेल्या मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' कादंबरीत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजातील सुशिक्षित अशा गोपाळ, पांडुरंग व आनंदा या तरूणांनी मुंबई व आपल्या खेडेगावी चालविलेल्या दलित चळवळींचे चित्रण झालेले पाहवायस मिळते. या दृष्टीने शहरात व कोकणातील खेडेगावात वास्तव्य करणाऱ्या दलितांच्या जीवनांचे चित्रण कर्णिक प्रामुख्याने करताना आढळतात. शिकून सवरून स्वावलंबीपणाने व स्वाभिमानाने जगू पाहणाऱ्या दलितांच्या जीवनाची कोंडी खेडेगावातील स्पृश्यवर्गीय कशी करतात, त्यांची अवहेलना कशी केली जाते. याचे प्रत्यकारी चित्रण सदर कादंबरीतून आलेले आढळते.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीमध्ये मधु मंगेश कर्णिक एका अस्पृश्य कुटुंबाच्या स्थित्यंतराचा आढावा घेतात. त्यांच्या पात्रांच्या मनात विद्रोह आहे कारण स्वातंत्र्यानंतर

दलितांच्या मनामध्ये जे एक वैफल्य निर्माण झालेले आहे, त्या समाज व्यवस्थे विरूद्ध त्यांच्या मनात विद्रोह निर्माण होतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी झपाटलेला परंतु परिस्थितीने कधी-कधी असहाय्य अथवा अगतिक होऊन देशाविरूद्ध, धर्माविरूद्ध, धर्मग्रंथाविरूद्ध, बंडाची भाषा बोलणारा गोपाळ आणि विद्रोही मनाचा आविष्कार असलेला आनंदाचा ज्वलंतपणा, परंपरा न झुगारू शकणारा गोपाळचा बाप नि पत्नी ही विलक्षण पात्रे, महारांच्या घरातील, त्यांच्या वागण्यातील वृत्ती-प्रवृत्तीसह अनेक बारकाव्यानिशी या कादंबरीत येतात.

समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे, बदलत्या काळाचे, काळानुसार बदलणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचे आणि मूल्यव्यवस्थेचेही चित्रण या कादंबरीत येते. स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सवाचा आनंद साजरा करण्यासाठी बोलविलेल्या समारंभात आनंद उठून बोलतो, "अहो, तुम्ही कसला रौप्य महोत्सव साजरा करणार आहात? समतेवर आधारलेली राज्यघटना ज्यांनी तुम्हांला लिहून दिली. त्या डॉ. आंबेडकरांच्या बांधवांसाठी तुम्ही गेल्या पंचवीस वर्षात काय केल आहे? आमची परीक्षा घेणारे नि नापास करणारे तुम्हीच? काय देनं लागतो आम्ही या देशाचं? कसली भाकरी आणि फूल? कसला देश आणि कसले स्वातंत्र्य आणि कसला आलाय राष्ट्रध्वज! एक रंगीत शुद्र फडकं वाटत ते आम्हांला"[४] स्वातंत्र्याच्या प्रतिकाबद्दल दलित मनाला वाटणारी चीड यातून व्यक्त झाली आहे. दलितांना स्वातंत्र्याबद्दल काय वाटते? तसेच पंचवीस वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही गावचा महारवाडा तसाच आहे. स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षात जर त्याला काहीच मिळाले नसेल तर देशालाही काहीच मिळालेले नाही का? याचं खरखुरं दर्शन या कादंबरीच्या आशयातून दिसून येते. डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यामुळे दलित समाजावर किती जबरदस्त प्रभाव पडलेला होता हे ही आनंदाच्या व्यक्तिरेखांतून दिसून येते, "आंबेडकर, अब्राहम लिंकन, ल्युथर हे माझे आदर्श आहेत. मी देव मानीत नाही. पण नमस्कारच करायचा असेल तर मी तो ज्योतिबा फुले आणि शाहू महाराज यांना करीन आम्हांला हजारो वर्षे चिखलात आणि स्वत:च्या विष्ठेत लडबडणाऱ्या हिंदू धर्मावर मी थुंकलो तर माझ्या पवित्र थूंकीचा अपमान होईल."[५] दलित सुशिक्षित तरूणाच्या मनातील देशाविषयी व संस्कृतीविषयीची चीड कर्णिक यांनी आनंदा या व्यक्तिरेखेद्वारे यथातथ्य व्यक्त करतात. सद्य:स्थितीतील दलितांचे प्रतिनिधित्व

करणारे व्यक्तिचित्र कर्णिकांनी वास्तवतेने रेखाटले आहे. त्यामुळे आाशयसूत्राला एक संघटन येते.

'भाकरी आणि फूल' कादंबरीत येणारे वास्तव हे 'सामाजिक वास्तव' आहे. या वैशिष्ट्यामुळे ही कादंबरी अनेक केंद्री बनते. कारण घटनांचा व काळाचा विशालपट घेऊन दलित व्यक्ती वा कुटुंबे समाजात कशी वावरतात, व्यक्ती-व्यक्ती मधील संबंधातून आणि समाज या तत्त्वाशी होत असणाऱ्या संघर्षातून माणसे कशी व्यवहार करीत असतात, याचे तपशीलवार चित्रण कर्णिक करताना दिसतात. दलितांच्या स्थितीसंबंधी प्रश्न विचारता एकूणच मानवी स्वभावावर मानवी समूहाच्या वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश टाकतात. दलित जीवनाविषयीचे त्यांचे भान सर्वंकषपणे व्यक्त झालेले आहे.

मधु मंगेश कर्णिक 'भाकरी आणि फूल' कादंबरीत दलित समाजाच्या स्थित्यंतराचा व्यापक आढावा घेताना दिसतात. कुटुंबाच्या किंवा समाजाच्या जगण्याचा सर्व बारकाव्यांशी सर्व पट पेलून धरण्याची ताकद फक्त कादंबरी वाङ्मयात आहे. म्हणूनच कर्णिक कादंबरी हा फॉर्म निवडतात. कादंबरी म्हणजे काय किंवा कादंबरीचा विशेष सांगताना भालचंद्र नेमाडे म्हणतात, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेले आहेत अशी साहित्यकृती."[६] वाङ्मय प्रकाराची व्याख्या तंतोतंत करता येत नसली तरी नेमाडेंच्या या व्याख्येवरून कादंबरीच्या स्वरूप विशेषावार प्रकाश पडतो. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीमध्येही आाशयसूत्राचे अनेक पदर आहेत. यातील पात्रे अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत. गोपाळ, पांडुरंग, आनंदा तसेच नलिनी व इतर अनेक गौणपात्रे यांचा संपूर्ण कादंबरीभर विकास पावत जात प्रत्येक व्यक्तिरेखेला तिच्या स्वभाव, गुण-दोषांसह न्याय देण्याचा प्रयत्न कर्णिक करताना दिसतात. त्यामुळे आशयाला एक भारदस्तपणा येतो. आशयसूत्र बळकट असल्यामुळे पात्रे सलग उभी राहतात. आशयाचा पट विशाल आहे. आणि समस्यांचा पाठपुरवा त्यांच्या विविध संदर्भासकट मांडलेला दिसतो. दलित समाजाचे, कुटुंबाचे तपशिलवार दर्शन घडविण्यात कर्णिक बऱ्याच अंशी यशस्वी होतात.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीला आशयसूत्राचे अनेक पदर असलेले दिसत. किंवा मुख्य आशयसूत्राबरोबर गौण आशयसूत्रेही येतात. उदा:- गावकुसाबाहेरील दलित जातीतील पोटभेदाचे चांगले चित्रण 'भाकरी आणि फूल' मध्ये आलेले दिसते. गोपाळची बायको देशावरचे महार आणि कोकणातील महार असा पोटभेद मानते. कोकणातील जातबांधवांना ती परके मानते. देशावरच्या महारांना कोकणातील महारांपेक्षा उच्च मानताना दिसते.

बौद्ध धम्म स्वीकारूनही दलितांनी हिंदू धर्मातील परंपरा पूर्णपणे नाकारलेल्या दिसून येत नाहीत. धर्म, बौद्ध आणि आचरण मात्र पूर्वीसारखेच हिंदू धर्मातील सण, देव-देवता, रीतिरीवाज यांचा त्यांनी पूर्णपणे त्याग केलेला नसल्याचे चित्रण कादंबरीत येते. बौद्ध धम्म स्वीकारलेल्या दलितांच्या अशा वागण्याला प्रामुख्याने त्यांचे अज्ञान, दारिद्रय कसे जबाबदार आहे, आज्ञानामुळे मुळात धर्म म्हणजे काय हे ही त्यांना समजू शकत नाही. धर्माचे तत्त्वज्ञान काय सांगत? आचरण कशा पद्धतीचे असावे? या गोष्टी त्यांना नीटपणे समजलेल्या नसतात. अज्ञान आणि दारिद्रयामुळे पिढ्यांनपिढ्या चालत आलेल्या श्रद्धा, अंधश्रद्धा, समजूती, परंपरा, एकाकी झुगारून देण्याचे मनाचे धाडस होत नाही. या संदर्भात 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील दलित समाजाचा धर्मांतराला विरोध असण्यामागची कारणे फारच बोलकी आहेत. धर्म बदलला की गावचा कोप होईल, वाजंत्री वाजविण्याची कंत्राटे मिळणार नाहीत, आणि महारकीचे उत्पन्न गमवावे लागेल ही भीती त्यांना वाटते. हे द्वंद्व या कादंबरीत अत्यंत परिणामकारक रीतिने प्रकट झाले आहे. अशा आर्थिक आणि सामाजिक अवास्तव प्रतिष्ठेखाली वावरणाऱ्या दलित समाजातील अशा माणसांना आपली वस्ती, समाज यांची घ्रुणा वाटते. प्रतिष्ठित म्हणविल्या जाणाऱ्या चार-चौघात, मित्रात त्यांना आपल्या जन्म-दात्यांना ओळख दाखवायला लाज वाटते. 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील मुंबईत प्राध्यापक असणाऱ्या मानेंचे उदाहरण याबाबतीत पाहता येईल. मुंबईला आलेल्या शिवनाक आणि मोन्याच्या आग्रहाखातर त्यांना पांडुरंग माने यांच्या घरी घेऊन जातो. ते त्यांचे नातेवाईक असतात. माने घरी आलेल्या या तिघांना साधा चहा देखील देत नाहीत आणि आपण घाई-गडबडीत आहे असे दाखवून घरातून जवळ-जवळ त्यांना हाकलून लावतात. आपल्या समाजातील शिकलेल्या, अधिकारावर

असलेल्या व्यक्तीबद्दल सर्वसामान्य दलित समाजाच्या मनात आदर असतो. आपल्या समाजातील साहेबाने आपल्याला ओळखावे एवढीच माफक अपेक्षा असते. अशा माणसांकडून सर्वसामान्य दलित माणसाला भावनिक आधार हवा असतो. सामजिक सुरक्षितेची आणि पाठिंब्याची गरज असते. सर्वसामान्य दलित समाजाच्या या अपेक्षा अशा माणसांच्याकडून पूर्ण होत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य दलित समाजाच्या मनामध्ये अशा माणसांच्याबद्दल नाराजीची भावना कशी आहे, हे कादंबरीकारांनी दाखविले आहे. अशी लहान-लहान आशयसूत्रे मुख्य आशयसूत्राला पूरक ठरतात. तसेच कथानकाला पात्राद्वारे समूहाच्या जगण्याचे त्यांच्या जीवन दर्शनाचे वेगवेगळे पैलू दाखवतात.

एकूणच आशयसूत्राचा विचार करता दलित जीवनातील दु:ख, दैन्य, दारिद्रय, आंतरिक आणि बाह्य स्वरूपाचे ताण-तणाव कादंबरीसारख्या आशयाचा आवाका मोठा असणाऱ्या वाङ्मय प्रकारातून चांगल्या प्रकारे चित्रित होऊ शकतो. हे कर्णिक दाखवून देतात. मधु मंगेश कर्णिक हे दलितेतर (सवर्ण) असून देखील दलित जीवनचित्रणामध्ये त्यांच्या अंतरंगात शिरून त्यांच्या मन-भावना-विचारांचे चित्रण करताना दिसून येतात. दलित जीवनाच्या मोजक्याच अंगावर प्रकाश न टाकता त्यांची घरे-दारे, त्यांचा उद्योग, व्यवसाय, त्यांचे दु:ख, दारिद्रय आणि त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार, तसेच या अन्यायाविरुद्ध बंड पुकारून उभारलेला लढाही ते टीपताना दिसतात. स्वातंत्र्यानंतरच्या पंचवीस वर्षातील दलित सुधारणांचे यशापयश परिणामकारकतेने मांडताना कर्णिकांनी लिहिलेल्या दलित जीवन चित्रणाचा वेगळेपणा स्पष्ट होतो. दलित जीवन चित्रणाचा हेतू ठेवूनच कर्णिक ही कादंबरी लिहिताना दिसतात. त्यामुळे दलितांमधील जुन्या आणि नव्या पिढीची मानसिकता नीट समजावून घेतलेली दिसते. त्यामुळे त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा परंपराचे चित्रणही आपल्याला या कादंबरीच्या आशयसूत्रावर प्रकाश टाकल्यास दिसून येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पंचवीस वर्षाच्याकाळातील एकूणच दलित समाजाच्या स्थित्यंतराचा आलेख येथे कर्णिक रेखाटताना दिसतात.

## ❖ 'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील समान आशयसूत्र साम्य आणि भेद :

आशयसूत्र म्हणजे साहित्यकृतीच्या आशयसूत्राचे किंवा अनुभवविश्वाचे केंद्रवती वा मध्यवर्ती सूत्र होय. साहित्यकृतींच्या सर्वांगाना एकात्म करणारे एक संघटनतत्त्व म्हणूनही ते सौंदर्यात्मक कार्य करत असते. हे आपण पाहिलेले आहे. या आशयसूत्राच्या आधारे किंवा एकच आशयसूत्र घेऊन त्याच्या आधारे अनेक साहित्यकृतींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. "एकाच किंवा अनेक साहित्यकृतीत आढळून येणाऱ्या समान आशयसूत्राच्या आधारे साहित्याचा जो तुलनात्मक अभ्यास वा समीक्षा केली जाते त्यास तुलनात्मक आाशयसूत्रमीमांसा असे म्हणतात."[७] प्रस्तुत ठिकाणी 'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील साम्य-भेदाची तुलना करणे अपेक्षित आहे. ही तुलना करून साहित्य प्रकारानुसार त्या-त्या रूपाचा काही प्रभाव आशयसूत्रावरती जाणवतो का याचाही शोध येथे घ्यावयाचा आहे.

एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्त्व म्हणजे साहित्यकृतीचे आशयसूत्र होय. ते साहित्यकृतीतील सर्व घटकांना तपशिलांना जोडणारे असते. "प्रत्येक साहित्यकृतीला दोन अंगे असतात एक म्हणजे अविष्काराचे अंग आणि दुसरे म्हणजे आशयाचे अंग साहित्यकृतीच्या वाचन प्रक्रियेत या दोन्ही अंगाची अभेदनाने प्रतीती येत असते."[८] असे गंगाधर पाटील यांनी वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोशात भूमिका मांडली आहे. आशय आणि अविष्कार यांच्यात एकजीव एकजिनसीपणा येणे ही बाब येथे अपेक्षीत आहे. म्हणजेच आशय आणि अविष्काराचा अंतर्गत संयोग होऊन संबंधित जाणिवेला जीवंत करण्याचे एक संघटन क्रियाशील होते. साहित्यकृतीतील आशय, पात्रे, स्थळ, काळ, घटना, प्रसंग या घटकांनी संघटीत केलेला असतो, ही संघटना आाशयसूत्रावरती आधारलेली असते. मूळ आशयसूत्र एकच असले तरी आशयद्रव्याचे घटक आणि त्यांची संघटना यातील भिन्नतेमुळे कादंबरी, नाटक असे भिन्न-भिन्न रूपबंध आकारास येत असतात. 'भाकरी आणि फूल' कादंबरी व 'वाटा-पळवाटा' नाटक यातील मूळ आशयसूत्र एकच असले तरी आशयद्रव्याचे घटक वेगळे आहेत. त्या-त्या फॉर्म नुसार ते कृती करताना दिसतात.

15174

दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटकामध्ये दलित समाजातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्या आहेत. या तीन पिढ्यांमध्ये असणारे अंतर फार गुंतागुंतीचे आहे. पहिली पिढी इंग्रजांच्या राजवटीतील अशिक्षित एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी एवढा बौद्धिक आवाकाही नसाणारी पण प्रामाणिक कार्यकर्त्यांची. दुसरी पिढी सुशिक्षित, थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली, स्वातंत्र्याच्या आगमनामुळे लोकशाही जीवनपद्धतीचे आश्वासन मिळालेली. या पिढीच्या सभोवतीचे वास्तव ध्येयवादी वातावरणाच्या धुक्यामुळे काहीसे उबदार व धुसर झालेले या पार्श्वभूमीवर आपल्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करणारी. तर तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातील परिवर्तनाची गती आणि अपेक्षा यातील व्यस्तप्रमाणामुळे संतापलेली धाडसी पण लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली. या तीन पिढ्या दलित समाजातील पूरग्रस्तांना घरे मिळवून देण्यासाठी एकत्र येतात. येथे आंबेडकरी चळवळीतील या तीन पिढ्यांतील व्यक्तिरेखांचा मानसिक, शारीरिक तसेच वैचारिक संघर्ष घडून येतो. हे 'वाटा-पळवाटा' नाटकाचे केंद्रवर्ती सूत्र आहे. त्याचप्रमाणे मधु मंगेश कर्णिकांच्या 'भाकरी आणि फूल' या कांदबरीचे मूळ आशयसूत्र आहे, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजातील सुशिक्षित अशा गोपाळ, पांडुरंग व आनंदा या तरुणांनी मुंबई व आपल्या खेडेगावी चालविलेल्या दलित चळवळींचे चित्रण आहे. येथे ही तीन पिढ्या येतात. या कादंबरीमध्ये कर्णिक एका अस्पृश्य कुटुंबाच्या स्थित्यंतराचा आढावा घेतात. तसेच दलित चळवळीतील तीन पिढ्यांचा संघर्ष समृद्धपणे रेखाटताना दिसतात. दलितांना स्वातंत्र्याबद्दल काय वाटते? तसेच पंचवीस वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही गावचा महारवाडा तसाच आहे. स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षात त्याला जर काही मिळाले नसेल तर देशालाही काहीच मिळालेले नाही याचे चित्रण कर्णिक या कादंबरीतून करतात.

दोन्ही कलाकृतींच्या मूळ आशयसूत्रात बरेच साम्य आहे. दोन्ही कलाकृतीमध्ये दलितांच्या तीन पिढ्यांची मांडणी केली आहे. दोन्हीही कलाकृती मधील या तीन पिढ्या आंबेडकरी विचाराशी, चळवळीशी बांधील राहून कार्य करताना दिसतात. भगत आणि कर्णिक या चळवळीच्या यशापयशाची चर्चा करत तीन पिढ्यांचा आंबेडकरी विचार आणि

प्रत्यक्ष जीवन जगताणाचे ताण-तणाव हा मानसिक व शारीरिक संघर्ष हाच दोन्ही कलाकृतीचे मुख्य आशयसूत्र आहे.

दोन्ही कलाकृतीचे मूळ आशयसूत्र एकच असेल तरी आशयद्रव्याचे घटक आणि त्यांची संघटना यातील भिन्नतेमुळे कादंबरी नाटक रूपपबंधाच्या दृष्टीने ते वेगवेगळया रूपबंधात आकारास येतात. 'वाटा-पळवाटा' नाटकामध्ये दत्ता भगत संघर्ष रूपाने 'नाट्य' उभारण्याचा (दिग्दर्शनाचा) प्रयत्न करतात तर मधु कंगेश कर्णिक 'भाकरी आणि फूल' मधून वस्तुस्थिती दर्शन (कथन) हे कथनात्मक अभिव्यक्तीचे दर्शन घडविताना दिसतात. एकंदरीत साहित्यकृतीत येणारे आशयसूत्र हे साहित्यप्रकारांच्या संकेतव्यूहानूसार निर्माण झालेल्या सामिष्टरूपावरून त्या साहित्यकृतीच्या आशयसूत्राचे स्वरूप निश्चित होताना दिसते. हे वरील दोन्ही कलाकृतीचा मुळ आशय एकच असले तरी विषय विषय भिन्न आहेत यारून दिसून येते.

कोणतीही साहित्यकृती एकाच आशयसूत्रापाशी सिमित वा बंदिस्त करता कामा नये. कारण अनिश्चितार्थता अनेकार्थता तसेच अर्थप्रसारणता हे साहित्यकृतीचे साहित्यधर्म आहेत, साहित्यिक संहितेच्या अर्थांगातूनच साहित्यकृतीच्या आशयसूत्राची जडण-घडण होत असते. एखाद्या साहित्यकृतीला एक किंवा एकाहून अधिक प्रधान-गौण आशयसूत्रे क्रियाशिल असतात. 'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या दोन्ही कलाकृतीमध्ये अशी काही गौण आशयसूत्रे येतात. या गौण आशयसूत्रातही काही साधर्म्य आढळून येते. तसेच काही भेद आहेत. उदा. दलित जातीतील पोट भेदांचे चित्रण दोन्ही कलाकृतीत येते तसेच बौद्ध धम्म स्वीकारूनही दलितांनी हिंदू धर्मातील परंपरा पूर्णपणे नाकारलेल्या दिसून येत नाहीत. धर्म, बौद्ध आणि आचरण मात्र पूर्वीसारखेच हिंदू धर्मातील सण, देव-देवता, रीतिरीवाज यांचा पूर्णपणे त्याग केलेला नसतो. हे दोन्ही कलाकृतीतील स्त्री पात्रांच्या आचरणात विशेषत:हा दिसून येते.

आशयसूत्राची संरचना किंवा आशयसूत्र संहितेच्या बाहेरील समाजवास्तवाशी सांस्कृतिक विचारप्रणालींशी संबंधित असते. वरील दोन्ही कलाकृतीत यामध्ये साम्य दिसून येते. आंबेडकरी चळवळ, तिची वाटचाल तसेच दलित समाजाच्या स्थित्यंतराचा आलेख एकूणच दलित समाजातील वेदना, विद्रोह दोन्हीही कलाकृतीत येतो. हे सामाजिक

वास्तव ही सांस्कृतिक जाण दोन्ही कलाकृतीच्या आशयसूत्रामध्ये दिसून येते. तसेच दलितांचे आत्मभान आणि जागृती यातून घडविणारी दलितांची सामाजिकता आणि मानसिकतेचा वेध या दोन्ही कलाकृतींच्या आशयसूत्र पाहिल्यानंतर घेतलेला आहे असे दिसून येते.

'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील आशयसूत्राच्या साम्य-भेदांची चर्चा करताना आपल्या असे लक्षात येते की आशयसूत्रात काही प्रमाणात भेदही आहेत. या पाठीमागे लेखकाची मूल्यदृष्टी, तसेच वाचककेंद्री आणि महत्त्वाचे आशयसूत्र हे साहित्यकृतीकेंद्री ही असते. यामुळे काही प्रमाणात भेदही निर्माण होतात. दलित समाज सध्या संघर्षाच्या कालखंडातून प्रवास करतो आहे. अनिश्चितता, असुरक्षितता, समग्र समाजाला मानवी समूहाला एकत्र बांधू शकणाऱ्या मूल्यव्यवस्थेचा अभाव पारंपरिक मूल्यव्यवस्थेची अर्थहीनता सांस्कृतिक अनेक मुखीपणा हे या स्वातंत्र्योत्तर कालखंडाचे अधांतरी असणाऱ्या दलित समाजाची मानसिकता व्यक्त झाली आहे. याबाबतीत दोन्ही लेखकाची मूल्यदृष्टी सारखीच असल्याचे आपणास दिसून येते. परंतु साहित्यकृतीच्या रूपाच्या (फॉर्म) मर्यादा आशयसूत्रावर पडताना दिसतात. नाटक म्हटले की सतत काही घडावे लागते. वर्तमानाकडून भविष्याकडे वाहणारा कृतींचा तो एक प्रवाह असतो. अशा रीतीने एका प्रसंगातून दुसरा प्रसंग या क्रमाने नाटकात प्रसंगाची वा घटनांची सलग मालिका तयार होते. 'वाटा-पळवाटा' नाटकातील प्रयोगिकता पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, दत्ता भगत पूरग्रस्तांना घरे मिळवून देण्याच्या प्रसंग व नंतर काकाच्या असह्य मृत्यू पर्यंत अशी एक घटनांची मालिका तयार करतात की सर्व घटना प्रसंग प्रेक्षकांच्या समोर उभा राहतो. या घटना प्रसंगातून नाटकाचा विषय जो नाटकाच्या रचनेतच गर्भित असतो, तो या घटना-प्रसंगामधून अभिव्यक्त होताना दिसतो.

कादंबरी हे कथनात्मक गद्य असते. कादंबरी हा लवचिक व सर्वसमावेशक साहित्यप्रकार आहे. 'सामाजिक वास्तव' या वैशिष्ट्यांमुळे कादंबरी अनेक केंद्री बनते कारण घटनांचा व काळाचा विशालपट घेऊन व्यक्ती वा अनेक कुटुंबे समाजात कशी वावरतात, व्यक्ती-व्यक्तींमधील संबंधातून आणि समाज या तत्त्वाशी होत असणाऱ्या संघर्षातून माणसे कशी व्यवहार करीत असतात त्याचे तपशीलवार चित्रण कादंबरीकार करू

लागतो. मानवी स्थितीसंबंधी प्रश्न विचारता तो एक सामाजिक अस्तित्व या दृष्टिकोनातून मानवी स्वभावावर मानवी समुहाच्या वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश टाकू लागतो. जीवनाविषयीचे त्याचे भान, सर्वकषपणे मग व्यक्त होऊ लागते. या दृष्टीने 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचा किंवा कादंबरीच्या एकूण आशयसूत्राचा विचार करता आपणांस असे दिसून येते की, या कादंबरीच्या आशयाला एक सामाजिक संदर्भ आहे. या कादंबरीतील माणसे दलित समाजाचे प्रतिनिधित्व करतात. मधु मंगेश कर्णिक यांनी केलेली सामाजिक वातावरण निर्मिती येथे महत्त्वाची ठरते. माणसां-माणसांमधील परस्पर व्यवहारांचे चित्रण या कादंबरीमध्ये येते. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील सामाजिकतेचे वैशिष्ट्ये हे आहे की, ती परिवर्तनशील गतिशीलतेवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे काळानुसार परिस्थितीतील बदलानुसार मानवी संबंधामध्ये कसा फरक पडत जातो याचे चित्रण येते. त्यामुळे 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी गतिमान असलेल्या काळाचे भान देते काळानुसार बदलत जाणाऱ्या सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाचे दलित समाजातील व्यक्तींवर तसेच एकूणच मानवी वर्तनावर कसे-कसे परिणाम होतात. याचे चित्रण ही कादंबरी करते.

कादंबरीत काही ठिकाणी 'कथन' आहे तर काही ठिकाणी 'चित्रण' आहे. कादंबरी नाटकासारखी समोर दिसत नसल्यामुळे त्यामध्ये कथन येते. परंतु मधु मंगेश कर्णिकांनी कथनापेक्षा 'चित्रणाला' अधिक महत्त्व दिल्यामुळे 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी कलात्मकही ठरते.

साहित्यकृतीकेंद्री विचार मध्यवर्ती ठेवून आशयसूत्रांच्या साम्य-भेदाकडे पाहिल्यास विशेषत: भेद दिसून येतात. 'वाटा-पळवाटा' हे नाटक पूरग्रस्तांच्या समस्येवर पहिली पिढी, दुसरी पिढी, आणि तिसरी पिढी यांच्या मानसिकतेचे चित्रण करते. तर 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी (कलाकृती) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलितांच्या समस्यांचे चित्रण करताना तीन पिढ्यांची मानसिकता चित्रित करते. पूरग्रस्त दलित समाजाची समस्या हे बीजसूत्र 'वाटा-पळवाटा' नाटकाचे आहे तर 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचे बीजसूत्र स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलितांचे जीवन हे आहे. म्हणजे आशय एक मात्र विषय भिन्न हा भेद या कलाकृतीतून दिसून येतो त्याच बरोबर 'भाकरी आणि फूल' कादंबरी कोकणाच्या पार्श्वभूमीवरील दलित जीवनांचे चित्रण करते तर 'वाटा-पळवाटा' ह्या

नाटकाला असा प्रादेशिक आशय देता येत नाही. साहित्यकृती विचार केंद्रवर्ती ठेवून आशयसूत्राकडे पाहिल्यास दोन्ही कलाकृतीमध्ये वरील स्वरूपाचे भेद अपणांस दिसून येतात.

भिन्न वाङ्मय प्रकारातून (कादंबरी आणि नाटक) भिन्न काळातील निर्मिती व्यवहार जर एकाच आशयसूत्रावरती असेल तर हा वाङ्मयीन व्यवहार कोणत्या स्वरूपाचा असतो. हे आपण येथे विस्ताराने पाहिले आहे. यातून आपल्याला असे दिसून येते की, हा वाङ्मयीन व्यवहार समान आशयसूत्रावरती असूनही काही प्रमाणात साम्य तर काही प्रमाणात भेद असल्याचे आपण सकारण पाहिले. एकच आशयसूत्र घेऊन त्याच्या आधारे अनेक साहित्यकृतींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. एकाच किंवा अनेक साहित्यकृतीत आढळून येणाऱ्या समान आशयसूत्राच्या आधारे साहित्याचा जो तुलनात्मक अभ्यास व समीक्षा केली जाते त्या 'तुलनात्मक आशयसूत्रमीमांसा' या समीक्षादृष्टीने हा अभ्यास किंवा वरील विवेचन विस्तृतपणे केले आहे.

### ❖ समारोप :

'वाटा-पळवाटा' हे नाटक तसेच 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी याच्यातील साम्य-भेदांचा विचार करता या दोन्हीमध्ये केवळ भेद आहेत ते फॉर्मच्या अंगाने आणि हा फॉर्म वाङ्मय प्रकाराच्या भिन्नतेमुळे आलेला आहे. मात्र या कादंबरीतील आणि नाटकातील आशयाचा विचार करता ह्या दोन कलाकृती एकाच आशयसूत्रावरती निर्माण झालेल्या आहेत असेच म्हणावे लागते. कादंबरीचा लेखक दलितेतर, नाटकाचा लेखक नाटककार दलित, कादंबरीचा निर्मिती कालखंड सन १९८२ आणि 'वाटा-पळवाटा' चा निर्मिती कालखंड १९८८ असा आहे. या दोन निर्मिती कालखंडात या दोन कलाकृतींची निर्मिती झालेली असून या दोन्हीही कलाकृतीचे निर्माते भारतीय संविधानात मांडलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व या मूल्यावरती निष्ठा असणारे आहेत. भारतीय संविधानातील मूल्यव्यवस्थेची जडण-घडण करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. अशा या मूल्यांची प्राण-प्रतिष्ठा करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर लेखन आणि चळवळी केल्या. या वैचारिक आणि चळवळीतून दलितांच्या तीन पिढ्या उदयास आल्या.

हे बीजसूत्र या दोन्ही कलावंतानी आपल्या कृतीच्या केंद्रस्थानी कल्पीलेल्या आहेत. या दोन्हीही कलावंताचा निर्मिती क्षण भिन्न असल्यामुळे त्याप्रमाणे त्यांचा भाषिक प्रदेश एकच असल्यामुळे हा वाङ्मयीन व्यवहार जाणते- अजाणतेपने घडला असावा असे म्हणता येत नाही. म्हणजेच 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचे नाट्यरूपांतर म्हणजे 'वाटा-पळवाटा' हे नाटक होय असे संबोधण्याइतपत सार्धम्य या दोन कलाकृतीमध्ये आहे. त्यातही महत्त्वाची बाब म्हणजे 'भाकरी आणि फूल' या कादंबरी नंतर 'वाट-पळवाटा' या नाटकाची निर्मिती करणारे दत्ता भगत दलित साहित्य चळवळीतील एक महत्त्वाचे कलावंत असून ते मराठी विषयाचे प्राध्यापकही आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेला हा प्राध्यापक आंबेडकरी चळवळीच्या तीन पिढ्यांचे चित्रण करणाऱ्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचा वाचक म्हणून दूर असणे असंभवनीय होय असेच म्हणावे लागते. त्यामुळे समान आशयसूत्राचा आधार घेऊन 'भाकरी आणि फूल' व 'वाटा-पळवाटा' या नाटकाचा वाङ्मयीन व्यवहार तपासताना हे नाटक 'भाकरी आणि फूल' चे नाट्यरूपांतर होय असे म्हणण्या इतपत निष्कर्ष हाती येतात.

दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' या नाटकासंदर्भात दलित रंगभूमीच्या अनुषंगाने काही प्रश्नचिन्ह उभे करतात. दलित रंगभूमीची जी नव्याने मांडणी केली गेली त्यामध्ये प्रायोगिकतेला विशेष महत्त्व दिले गेले व या प्रायोगिकतेमध्ये पारंपरिक मराठी तमाशा, सत्यशोधकी जलसा आणि आंबेडकरी जलसा यांच्या प्रायोगिक व वाङ्मयीन प्रारूपाला महत्त्व दिले जाण्याचा आग्रह धरला गेला त्यानुसारच प्रकाश त्रिभूवन यांचे 'थांबा! राम राज्य येत आहे', भि. शि. शिंदे यांचे 'काळोखाच्या गर्भात' तर एकांकीकामध्ये प्रेमानंद गज्वी यांची 'घोटभर पाणी' आणि दत्ता भगत यांची 'आवर्त' या एकांकीकांनी दलित रंगभूमीच्या वेगळेपणाची नोंद होऊन त्याला मान्यताही मिळाली. दलित रंगभूमीचे वेगळेपण सिद्ध करण्यात उपरोक्त चार कलाकृतींचा सिंहाचा वाटा आहे. असे असतानाही दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक प्रयोगासाठी दलित कलावंताकडे न देता प्रस्थापित मराठी रंगभूमीवरील रंगकर्मीच्या जख्यामध्ये सहभागी झाली. त्यामुळे आशयापुरतेच हे नाटक दलित म्हणून संबोधले गेले. आविष्कार आणि प्रायोगिकदृष्ट्या ह्या नाटकांनी दलित रंगभूमीपासून पूर्णत: फारकत घेतली. तात्पर्य 'भाकरी आणि फूल' मधून आशयद्रव्य

कानेटकराकडून नाट्यद्रव्य आणि प्रस्थापित मराठी रंगभूमीवरील रंगकर्मी कडून पारंपरिक प्रयोगद्रव्य आत्मसात करून 'वाटा-पळवाटा' या नाटकाची वाटचाल झालेली दिसते. जर 'आवर्त' प्रमाणे दत्ता भगतची 'वाटा-पळवाटा' नाटकातील आशयद्रव्याची स्वतंत्र निर्मिती झाली असती तर कदाचित अशी तिहेरी तडजोडवादी भूमिका त्यांना घेता आली नसती. असेच म्हणावे लागते.

## ❖ निष्कर्ष :

१. साहित्यकृतीला दोन अंगे असतात. १) अविष्काराचे २) आशयाचे. साहित्यकृतीतील आशय आणि अविष्काराचे मूलद्रव हे अत्यंत महत्त्वाचे असते. नेणीवेला जाणिवेच्या पातळीवर आणण्यासाठी या दोन घटकातील एकजिनसीपणा किंवा त्यांची एकरूपता महत्त्वाची असते. 'वाटा-पळवाटा' तसेच 'भाकरी आणि फूल' या दोन कलाकृतीतील आशयाचे आणि आविष्काराचे घटक असेच एकजीव होऊन अपेक्षित जाणिवेला अधिक जीवंतपणा आणतात.

२. कोणत्याही साहित्यकृतीमध्ये स्थळ, काळ, घटना, प्रसंग आणि व्यक्तिरेखा आशयसूत्राद्वारे संघटित करण्याची प्रक्रिया घडत जाते. या सर्वांतून जो संघटित आविष्कार घडतो तो आशयाचे अभिन्नत्व सिद्ध करते. त्यामुळे विशिष्ट आशयसूत्र, विशिष्ट वाङ्मय प्रकाराच्या रूपबंदाशी एकरूप होते. 'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या दोन कलाकृतीचे आशयसूत्र एकच असले तरी या साहित्यकृतीद्वारे दोन रूपबंध अथवा वाङ्मयप्रकार जन्मास आले. हा वाङ्मयीन अपवाद म्हणावा लागेल.

३. दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक आंबेडकरी चळवळीतील तीन पिढ्याच्या केंद्रवर्ती सूत्रावर अधारित आहे. तसेच कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' कादंबरी सुद्धा काही घटना, प्रसंग, आणि व्यक्तिरेखा वजा करता उपरोक्त आशयसूत्रामध्येच बेतलेले आहे. तसेच स्थळ, काळ व्यक्तिरेखा, घटना आणि प्रसंग वेगळे असले तरी त्यात खूप समान स्थळे आहेत.

४. दोन्ही कलाकृतीचे आशयसूत्र एकच असले तरी रूपबंध म्हणून नाटक आणि कादंबरी असे भिन्नत्व त्यात आले आहे. त्यातूनच संवादात्मकता आणि निवेदनशीलता हे त्याचे वेगवेगळे प्रारूप अनुभवास येते. नाटकाच्या प्रारूपात पूरग्रस्ताच्या समस्येला महत्त्व दिले आहे. तर कादंबरीच्या प्रारूपात स्वातंत्र्योत्तर दलितांच्या समस्येला महत्त्व दिले आहे व त्या अनुषंगाने दोन्हीकडे तीन पिढ्यांची मानसिकता मांडली आहे. म्हणजेच या कलाकृतीमध्ये भेद केवळ अविष्काराच्या अंगाने अनुभवता येते.

५. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचा निर्मिती कालखंड १९८२ आणि 'वाटा-पळवाटा' चा निर्मिती कालखंड १९८८ असा असतानाही समान आशयसूत्रावरती नेणीवेच्या पातळीवर वाङ्मयीन व्यवहार घडणे संशयास पात्र वाटते. त्यामुळे दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचे नाट्यरूपांतर नव्हे ना? या निर्णयापर्यंत मानसिकता येते.

६. दत्ता भगत यांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक आशयद्रव्य 'भाकरी आणि फूल' कडून नाट्यद्रव्य कानिटकरांकडून नाट्यप्रयोगद्रव्य प्रस्थापित मराठी रंगकर्मीकडून स्वीकारून साकार झालेले दिसते.

---- ❖ ❖ ❖ ----

## ❖ संदर्भ सूची :


१. राजाध्यक्ष विजया (संपादक) : मराठी वाङ्मयकोश खंड-४ समीक्षा संज्ञा, प्रकाशन-सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई प्र. आ. नोव्हेंबर, २००२, पृ. ४०.

२. तत्रैव : तत्रैव, पृ. क्र. ७२

३. कांबळे विलास (संपादक) : 'दलित कादंबरीचे वेगळेपण' (लेख) 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी' संपादक - विलास खोले, मुद्रक/प्रकाशक - प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्मय गृह, भूपेश गुप्ता भवन ८५, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई, प्रथमावृत्ती-ऑगष्ट-२००२ पृ.क्र.१५६.

४. कर्णिक मधु मंगेश : 'भाकरी आणि फूल', प्रकाशक - केशव विष्णू कोठावळे, नाका मुंबई - ४- प्र. आ.-१८८२, पृ.१३४-१३५

५. तत्रैव : तत्रैव ,

६. नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वंयवर', पृ.क्र.१२७

७. राजाध्यक्ष विजया (संपादक) : मराठी वाङ्मयकोश खंड-४ समीक्षा संज्ञा, प्रकाशन-सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई प्र. आ. नोव्हेंबर, २००२, पृ.क्र.४१.

८. संपादक- गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, सजवाडे आशा, वरखेडे रमेश : वाङ्मयीन-संज्ञा-संकल्पना कोश, प्रकाशन - हर्ष भटकळ, जी. आर. भटकळ फाऊण्डेशन, ३५/सी. पं. मदन मोहन मालवीय मार्ग, मुंबई- प्र. आ. -डिसेंबर-२००१, पृ. क्र.-११७.